दिवाणी न्यायालय (व. स्तर) यवतमाळ
आवक / जावक क्र. ३५८८
दिनांक ५/८/२५

# -: निवीदा सुचना :-

जिल्हा सरकारी वकील कार्यालय यवतमाळ या कार्यालयातील कागदी कातरन (वेस्ट पेपरची रद्‌दी) विकावयाचे आहे. करिता ज्या लोकांना कागदी कातरन रद्‌दी विकत घ्यावयाची असेल त्यांनी आपली निविदा या कार्यालयास दि. १८/०८/२०२५ चे सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत सादर करावी. त्यानंतर कोणतीही निवीदा स्विकारण्यात येणार नाही.

**कागदी कातरन (रद्‌दी) विकत घ्यावयाच्या अटीं व शर्ती खालील प्रमाणे आहेत.**

१) जमा असलेली कागदी कातरन (रद्‌दी) अंदाजे ३०० ते ४०० किलो तसेच कातरन न केलेली (रद्‌दी) अंदाजे ६०० ते ७०० किलो आहे.

२) निविदेमध्ये दर्शविलेल्या कागदी कातरन (रद्‌दीचा) भाव हा प्रति २० रु किलो व कातरन न केलेल्या रद्‌दीचा भाव हा प्रति १५/— रु. किलो प्रमाणे लिहावा.

३) संपुर्ण मालाची किंमत एकमुस्त दयावी लागेल.

४) खरेदीदार यांनी जिल्हा सरकारी वकील कार्यालय, यवतमाळ यांचेकडील रद्‌दी बारदान्यांसह घेतल्यास प्रति बारदाना रुपये २०/—रु. शुल्क अतिरिक्त आकारण्यात येईल.

५) खरेदीदाराकडून नियम १५.७ प्रमाणे रद्‌दी कागदाचे वजन करतेवेळी त्याने अचुक वजन दर्शविणारे, नियंत्रण वजने व मापे किंवा इलेक्ट्रॉनिक्स मॅट्रीक्स काटा वापरण्याबाबत खरेदीदारास निर्देश देणे बंधनकारक आहे.

६) ज्या खरेदीदाराची निविदा मंजुर होईल त्यांनी कागदी कातरन रद्‌दी व कागद तसेच कात्रण न केलेली रद्‌दी मोजुन घेण्याकरीता तराजु वजन काटा व सर्व माल भरण्याकरीता पोत्यांची व्यवस्था करुन तो माल येथून नेण्याची व्यवस्था करावी.

७) निविदा मंजुर झाल्याचे कळल्यापासून माल तीन दिवसाच्या आत किंवा वाढविलेल्या मुदतीच्या आत उचलून न्यावा लागेल. तसे न केल्यास नवीन निविदा पुन्हा बोलाविण्यात येईल व माल विकल्या जाईल.

८) कोणतीही निविदा कारण न दाखविता नामंजुर करण्याचा अधिकार मा. जिल्हा सरकारी वकील तथा शासकिय अभियोक्ता, यवतमाळ यांना राहील.

आदेशानुसार

जिल्हा सरकारी वकील,तथा
शासकिय अभियोक्ता, यवतमाळ

जा.क्र.५८८ /जिल्हा सरकारी वकील कार्यालय, यवतमाळ/२०२५
दिनांक : ०५/०८/२०२५

**प्रतिलीपी माहितीस व योग्य कार्यवाहीस अग्रेषित** :

१) जिल्हा व सत्र न्यायालय, यवतमाळ येथील नोटीस बोर्डावर लावण्याकरीता.

२) जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ येथील नोटीस बोर्डावर लावण्याकरीता.

३) तहसिल कार्यालय, यवतमाळ येथील नोटीस बोर्डावर लावण्याकरीता

४) जिल्हा परिषद कार्यालय, यवतमाळ येथील नोटीस बोर्डावर लावण्याकरीता.

५) सार्वजनिक बांधकाम विभाग, यवतमाळ येथील नोटीस बोर्डावर लावण्याकरीता

६) संगणक विभाग, जिल्हा व सत्र न्यायालय यवतमाळ सदरची प्रत जिल्हा व सत्र न्यायालय, यवतमाळ चे संकेतस्थळावर प्रसिध्दी करण्याकरीता.

मा. दिवाणी न्यायाधीश (व. स्तर) यवतमाळ
यांना विनंती करण्यांत येते की,सदर निविदा बेलीफामार्फत बजावणी करुन अभिलेखाकरीता उलटटपाली या कार्यालयात सादर करण्यात यावी.

सविनय सादर.

जिल्हा सरकारी वकील तथा,
शासकिय अभियोक्ता, यवतमाळ